# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायकांळ)

जा.क्र. ४९४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—१०/०८/२०१६.

**१) अवैद्य रित्या प्राण्यांची वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा दाखल. :—**

दिनांक ०९/०८/२०१६ रोजी ०५.०० वा. दर. यातील आरोपीतांनी आपले ताब्यातील वाहनामध्ये २ म्हैस, ४ गाई असे एकुण ६ पाळीव प्राणी अपु—या जागेत त्रास होईल अशा पध्दतीने निर्दयतेने कोंबुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने असे सरतर्फे फिर्यादी पोउपनी. लाखडे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ११(ए)(ड)(ई) प्राणी. वा.प्र.का. १९६० सहकलम ११९ मपोवा. भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. लाखडे पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत. दोन्ही आरोपी अटक आहे.

**२) ट्रकने उभ्या असलेल्या ट्रकला धडक दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०८/०८/०१६ रोजी २१.०० वा. दरम्यान आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन रोडाचे साईडला उभ्या असलेल्या ट्रक क्र. एमएच ३१ आरजे ०४/जीए ७८८९ ला धडक देवुन त्याचे ट्रक क्र. एमएच ४० एके २०३४ स्वत:चे ट्रकचे नुकसान होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी नेमीचंद दिपाराम यादव वय ४९ वर्ष रा. धारणा जि. राजस्थान यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९ भादंवि सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोउपनी. गोपाले पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**३) झाडावरून पडल्याने इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक ०८/०८/२०१६ रोजी १४.०० वा. ते ०९/०८/२०१६ चे ०८.०० वा. दर. यातील मृतक सैयद शेर अली नजाम अली पटेल वय ३७ वर्ष रा. गणेश । वार्ड पवनी हा बकरीचा चारा आनण्या करीता वाही जलाशया जवळील असलेल्या झाडावर चडुन फांदया तोडत असतांना झाडावरून पाय घसरून खाली पडुन डोक्याला मार लागुन मरन पावल्याने फिर्यादी सैयद इरफान अली पटेल वय ३५ वर्ष रा. पवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील चौकशी पोहवा. कटारे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक ०८/०८/२०१६ रोजी ०९.०० वा. दर. यातील मृतक कृष्णा गोवर्धन कुथे रा. देव्हाळा हा जास्त दारू पिऊन त्याची प्रकृती बिघडल्याने त्यास औषधोपचारा सा.रू. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरन पावल्याने डॉ. मेमो वरून पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१६ क. १७४ जाफौचे कागतपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. साठवणे यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. करडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील चौकशी पोहवा. सलामे पो.स्टे. करडी हे करीत आहेत.

**५) प्रकृती बिघडल्याने उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक ०६/०८/२०१६ रोजी ०६.०० वा. दर. यातील मृतक रंजीत राधेपुरी गोस्वामी वय ३५ वर्ष रा. गांधी नगर जि. कवर्धा छ.ग. याची अचानक प्रकृती बिघडल्याने त्यास प्रथमोपचारा करीता सनफ्लॅग कंपनी मधील दवाखानाण्यात उपचार करून पुढील औषधोपचारा करीता सा.रू. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरन पावल्याने डॉ. मेमो क्र. ००/१६ क्र. १७४ जाफौचे कागतपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. हुकरे यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. वरठी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील चौकशी पोहवा. पटले पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

**प्रत,** **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.